MHKO030072372022

**म.कौ.हिं.स.का.अर्ज क्रं.१७८/२०२२**

प्रियंका अमोल भालकर

वि.

अमोल प्रकाश भालकर

**निशाणी ५ वरील आदेश**

(पारित दिनांकः १० एप्रिल, २०२३)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा रु.१०,०००/- अंतरिम पोटगी तसेच त्यांची स्वतंत्र राहणेची व्यवस्था करुन त्यांना दरमहा रक्कम रु . ५०००/– इतके घरभाडे, नुकसान भरपाई रक्कम रु.२,००,०००/–, वकील फी रक्कम रु.५०,०००/–, प्रत्येक नेमलेल्या तारखेस न्यायालयात येण्याजाण्यासाठी प्रवास खर्च रक्कम रु.२००/– मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार हिचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे**

अर्जदार क्र.१ चा वि.प. क्र.१ सोबत दिनांक १५/०९/२०१३ रोजी विवाह झाला. लग्नसंबंधातून त्यांना एक मुलगी आहे. वि.प. क्र.२ ते ४ हे अनुक्रमे अर्जदार क्र.१ हिचे सासरे, सासू व नणंद आहे. लग्न झाल्यानंतर अर्जदार या सासरी गेल्या लग्नानंतर सहा महिने कसेबसे तिला ब–यापैकी नांदवले त्यानंतर या ना त्या कारणावरुन भांडणतंटा करणे, अर्जदारांवर त्यांची मते थोपविणे, बारीकसारीक शुल्लक कारणांवरुन मानसिक व शारीरीक त्रास देणे इ. गैरप्रकार वि.प. करीत होते. अर्जदार हिने अर्जामध्ये तिच्यावर झालेल्या शारीरिक, मानसिक, भावनिक, शाब्दिक व आर्थिक छळाबाबत सविस्तर वर्णन केलेले आहे. वि.प. यांनी अर्जदार यांना दिनांक १०/०६/२०२२ रोजी घरातून हाकलून दिले आहे. सबब, अर्जदार हिने औषधपाणी, कपडेलत्ते व अर्जदार क्र.२ हिच्या शैक्षणीक खर्च व इतर अनुषंगिक खर्च यासाठी दरमहा रक्कम रु .१०,०००/– अंतरिम पोटगी मिळावी तसेच अर्जदार यांची स्वतंत्र राहणेची व्यवस्था करुन अर्जदार यांना दरमहा रक्कम रु. ५०००/– इतके घरभाडे, नुकसान भरपाई रक्कम रु.२,००,०००/–, वकील फी रक्कम रु.५०,०००/–, प्रत्येक नेमलेल्या तारखेस न्यायालयात येण्याजाण्यासाठी प्रवास खर्च रक्कम रु.२००/– मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

३. वि.प. क्र.१ यानी त्यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी आपले म्हणणे दाखल केलेले नाही. सबब, सदरचा अर्ज वि .प.क्र.१ यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला. वि.प.क्र.२ ते ४ यांनी आपले म्हणणे **नि.क्र.८** कडे दाखल करुन त्यांच्याविरुध्दची कथने नाकारली आहेत.

४. अर्जदारतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला . प्रकरणाची पाहणी केली असता माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत . मी त्यावरील निष्कर्श खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही तिचे वि .प. क्र.१ यांच्यासोबत कौटुंबिक संबंध असल्याचे सिध्द करते काय ? | ... होय. |
| २. | अर्जदार ही त्यांच्यावर वि.प. यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | ... होय. |
| ३. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | ... होय. |
| ४. | अर्जदार हे दरमहा रक्कम रु . ५०००/– इतके घरभाडे मिळण्यास पात्र आहे काय ? | ... अंशतः होय. |
| ५. | अर्जदार नुकसान भरपाई रक्कम रु.२,००,०००/– मिळण्यास पात्र आहे काय ? | ... नाही. |
| ६. | अर्जदार वकील फी रक्कम रु .५०,०००/– व प्रत्येक नेमलेल्या तारखेस न्यायालयात येण्याजाण्यासाठी प्रवास खर्च रक्कम रु.२००/– मिळण्यास पात्र आहे काय ? | ... नाही. |
| ७. | अर्जदार या संरक्षण अधिकारी यांच्यामार्फत तातडीचे संरक्षण मिळण्याकरीता पात्र आहे काय ? | ...होय. |
| ८. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत –**

५. सदरचा अर्ज हा उभयपक्षांचा साक्षीपुरावा सादर होण्यापूर्वीचा असल्याने अर्जदार हिला तिचे वि.प. यांच्यासोबत कौटुंबिक संबंध आहेत व ती त्यांच्या हाती कौटुंबिक हिंसाचारास बळी पडली आहे या बाबी प्रथमदर्शनी सिध्द करणे गरजेचे असते . या अनुषंगाने दोन्ही पक्षांचे कथनांचा विचार केला असता त्यांच्यामध्ये कौटुंबिक संबंध असल्याची बाब वादग्रस्त नसल्याचे दिसून येते. कौटुंबिक संबंधाबाबत वाद नसलेने मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत–**

६. सदरचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाचे कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. कलम २३ (१) नुसार न्यायालयास त्याच्यापुढील या कायद्यातील कुठल्याही कार्यवाहीमध्ये न्याय्य व योग्य अंतरिम आदेश पारित करता येतो. अर्जदार हिने वि.प. यांनी तिचा शारीरिक, मानसिक, भावनिक छळ करून कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय तिचा त्याग करुन तिच्या पोटापाण्याची, कपडेलत्याची, राहण्याची, औषधपाण्याची कोणत्याही प्रकारची व्यवस्था केलेली नसून तिला कोणाचाही आधार नसल्याचे तिने कथन केले आहे . परंतु वि.प. यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिचे कथन विनाआव्हानीत राहिले. अर्जदार हिने वि.प. यांच्याविरुध्द बरेच गंभीर आरोप केले असून निश्चितच त्यावर दोन्ही पक्षांचा साक्षीपुरावा झाल्यानंतरच निर्णय देता येईल . या क्षणी केवळ हे पाहणे गरजेचे आहे की, अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते किंवा नाही. या अनुषंगाने अर्जाची पाहणी केली असता अर्जदार हिच्यावर शारीरिक , शाब्दिक, भावनिक व आर्थिक हिंसाचार केल्याचे नमूद करण्यात आले आहे. अर्जदार हिला एक मुलगी असल्याची बाब वादग्रस्त नाही. लग्नानंतर ब–याच वर्षांनी अर्जदार ही कुठल्याही सबळ कारणाशिवाय वि.प. क्र.१ पासून वेगळी राहिल ही बाब पटणेजोगे नाही. अर्जदार हिने अर्जात तिच्यावर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबाबत केलेली कथने प्रथमदर्शनी विश्वासर्ह वाटते. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत–</u>**

७. पती या नात्याने पत्नीच्या संगोपणाची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही वि.प. क्र.१ याची आहे. वि.प. याने अर्जदार ही त्याच्यापासून विभक्त झाल्यानंतर तिच्या पालन पोषणाची कुठलीही व्यवस्था केली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते . अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे वि.प. क्र.१ यांचे स्वतःचे किराणामालाचे दुकान होते ते त्यांनी बंद केले असून सदरचा दुकानगाळा दरमहा रक्कम रु.११,०००/– ने भाडयाने चालविण्यास दिला आहे. वि.प.क्र.२ हे निवृत्त असून त्यांना दरमहा रक्कम रु.२५,०००/– इतकी पेन्शन मिळते. वि.प.क्र.३ व ४ हे दरमहिन्यास १० ते १५ हजार रुपये चटणी कांडप करुन मिळवितात. अर्जदार या वि.प. क्र.१ यांच्याकडूनच दरमहा पोटगी मिळण्यास पात्र आहे. वि.प. क्र.१ यांच्या मालकीचा दुकानगाळा असल्याबाबत प्रथमदर्शनी कोणताही पुरावा न्यायालयासमोर उपलब्ध नाही. सदर प्रकरणात अर्जदार हिने केलेले कथन सिध्द करण्याकरिता जरी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नसला तरी वि.प. यांनी सदर कामी हजर होवून आपले म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिचे कथन विश्वासार्ह वाटते. वि.प. जरी मोलमजुरी करतो असे जरी गृहित धरले तरी दररोज रक्कम रु.४००/– प्रमाणे दरमहा १०,०००/– मिळवित असेल याबाबत कोणतेही दुमत नाही. तसेच अर्जदार हिच्या म्हणण्याप्रमाणे तिच्या तुलनेत वि.प. याची आर्थिक परिस्थिती सधन असल्याचे स्पष्ट होते . पती या नात्याने अर्जदारच्या उदरनिर्वाहाची तसेच कपडे लथ्थे, औषधोपचार इत्यादीची व्यवस्था करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी वि.प.क्र.१ याची आहे परंतु ती जबाबदारी तो पार पाडत नसल्याचे स्पष्ट होते. वि.प. याची उत्पन्न मिळविण्याची क्षमता, त्याचे राहणीमान व अर्जदार हिच्या गरजा लक्षात घेता मी या निष्कर्शाप्रत पोहचले की , अर्जदार क्र.१ हिस दरमहा रु.१,५००/– व अर्जदार क्र.२ हिस दरमहा १,५००/– अंतरिम पोटगी देण्याचा आदेश करणे योग्य होईल. सबब मी मुद्दा क्र. ३ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत–</u>**

८. अर्जदार हिने तिला उत्पन्नाचे कुठलेही साधन नसल्याचे व तिची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याचे कथन केले आहे . अशा परिस्थितीत पती या नात्याने

अर्जदारच्या उदरनिर्वाहाची तसेच कपडे लत्ते , औषधोपचार इत्यादीची व्यवस्था करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी वि.प. याची आहे. अर्जदार हिने जरी घरभाडयाच्या रकमेची मागणी केली असली तरी तीने भाडेच्या घरात राहत असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आजच्या परिस्थितीत दैनंदिन जीवन जगण्याकरीता आवश्यक असलेल्या बाबींचा विचार केला असता तसेच वि.प. याच्या उत्पन्नाचा राहणीमानाच्या दर्ज्याचा विचार केला असता अर्जदारला दरमहा रक्कम रुपये २००० /– घरभाडे देण्याचा आदेश करणे मला रास्त वाटते. सबब मी मुद्दा क्र. ४ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ व ६ बाबत–</u>**

९. अर्जदार हिने नुकसानभरपाई पोटी रक्कम रु.२००,०००/– ची मागणी केलेली आहे. परंतु अर्जदार हिचे नक्की कोणत्या प्रकारे नुकसान झाले अथवा काय नुकसान झाले याबाबत तिने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही . तसेच अर्जदार हिने अर्जात कथन करीत असलेल्या बाबींचा निश्चितच दोन्ही पक्षांचा साक्षीपुरावा झाल्यानंतरच निर्णय देता येईल. तसेच वकील फी व न्यायालयातील तारखेला येण्याजाण्याकरीता मागणी केलेली दाद याबाबत अंतरिम अर्जासोबत ठरविणे यथोचित होणार नाही. तसेच अर्जदार यांना झालेला नुकसान भरपाईबाबत प्रथमदर्शनी कोणताही पुरावा न्यायालयासमोर नाही. सबब मी मुद्दा क्र. ५ व ६ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ७ बाबत–</u>**

१०. अर्जदार हिने सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रामुख्याने कलम १८ (अ), १८(फ) प्रमाणे वि.प. याचेपासून तिचे संरक्षण होण्याची मागणी केली आहे. मुद्दा क्र.२ वर चर्चा करतेवेळी वि.प. याने अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंचासार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द झाल्याच्या निष्कर्षाप्रत मी पोहोचले आहे . अशा परिस्थितीत अर्जदार हिला कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयातील तरतुदीप्रमाणे संरक्षण देणे क्रमप्राप्त आहे. सबब मी मुद्दा क्र. ७ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ८ बाबत–**

११. मुद्दे क्र. १ ते ७ चे निष्कर्षास्तव अर्जदार यांना कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचे कलम २३ नुसार वि.प. यांचे राहणीमान व अर्जदार यांच्या मूलभूत गरजा लक्षात घेता मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प. यांनी अर्जदार यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष किंवा इतर कोणत्याही प्रकारे मानसिक किंवा शारिरीक छळ होईल अशी कोणतीही गैरकृती करु नये असा आदेश देण्यात येत आहे.

३. वि.प. क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस रक्कम रु.१,५००/– व अर्जदार क्र.२ हिस रक्कम रु.१,५००/– मुळ अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्ज निकाली लागेपावेतो अंतरिम पोटगी द्यावी.

४. वि. प. क्र.१ याने अर्जदार यांना घरभाडयाच्या पोटी दरमहा रक्कम रु.२०००/– मुळ अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्ज निकाली लागेपावेतो दयावे.

५. वि.प. यांनी म.कौ.हि.सं.कायदा कलम १९(३) प्रमाणे तो भविष्यात अर्जदार हिला कोणत्याही प्रकारे शारिरीक व मानसिक त्रास होईल अशी कोणतीही कृती करणार नाही असे लेखी बंधपत्र या आदेशापासून एक महिन्याच्या आत दाखल करण्यात यावे.

६. अर्जदार हिला निर्देशीत करण्यात येते की, तिने मुळ अर्जावर विनाविलंब तिचा साक्षीपुरावा सादर करावा तसे न केल्यास अंतरिम आदेशाबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

७. आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयातील कलम २४ नुसार विनामुल्य देण्यात यावी.

८. सदरच्या अर्जाच्या खर्चाबाबत आदेश अंतिम आदेशाच्यावेळी करण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
Manasee Dipak Khasnis
Date: 2023.04.11
11:05:34 +0530

दि.१०/०४/२०२३. (एम. डी. खासनीस)

कोल्हापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी(कोर्ट क्र.८),

कोल्हापूर.